IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Impact Factor: 7.301

Volume 3, Issue 3, January 2023

# माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विविध शालेय उपक्रमातून मूल्य रुजविण्यात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

प्रा. डॉ. सिद्धार्थ सुधाकरराव होवाळ

सहाय्यक प्राध्यापक, अध्यापक महाविद्यालय, अहमदपूर

**गोषवारा:**

विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढत जाणारी राक्षसी प्रवृत्ती बातम्यांमधून दिसून येत आहे. परीक्षेमध्ये कॉपी करण्यास विरोध झाला तर आपल्याच शिक्षकावर हल्ला होण्याच्या घटना ही सामान्य बाब होत आहे. यातून मग माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविण्यासाठी घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली तयार करून सर्वेक्षण पद्धतीने संशोधन केले आहे. या शाळेमध्ये विशिष्ट उपक्रमातून विशिष्ट मूल्य रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात नाहीत. मूल्य व उपक्रम यांची जोड घातली जात नाही.

## प्रस्तावना

प्रत्येक व्यक्ती आपले जीवन कोणत्या ना कोणत्या विचारसरणीनुसार जगतो. व्यक्तीच्या जडणघडणीत घरातील वातावरण महत्त्वाचे असते, त्याचबरोबर जितके वाचन केले जाईल तितके विचार प्रगल्भ होतात. घरात मिळालेले संस्कार,समाजात वावरताना आलेले अनुभव व शिक्षण यावर प्रत्येकाची विचारसरणी अवलंबून असते व त्यानुसार जो तो स्वतःची मूल्य निर्धारित करतो. शिक्षणाचा विचार करता, विद्यार्थी पालकांपेक्षा शिक्षकांवर अधिक विश्वास,श्रद्धा ठेवतात. कदाचित त्यास कारणीभूत समाजातील शिक्षकाचे आदराचे स्थान असेल. त्यामुळेक्षकाची जबाबदारी आहे, त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबरच मूल्य रुजवण्याचा प्रयत्न करावा. परंतु मूल्य म्हणजे काय? कोणते मूल्य शाश्वत आहे? कोणती मूल्य

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Volume 3, Issue 3, January 2023

Impact Factor: 7.301

जीवनामध्ये स्वीकारावेत ? आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, वास्तववाद यासारख्या विचारसरणीमध्ये तसेच वैदिक, बौद्ध,इस्लाम कालखंडातील तत्त्वज्ञानाची मूल्यमीमांसा वेगवेगळी आहे. या विविध विचारसरणीचा विचार करता नेमकी कोणती मूल्य स्वीकारावीत हा प्रश्न पडतो. आज विज्ञानयुगामध्ये विद्यार्थी व शिक्षकांचा कल हा विज्ञान विषयाकडे अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थी विज्ञान विषयास अधिक महत्त्व देतात. विज्ञान व मूल्यांची जोड शिक्षकानी दयायला हवी. मूल्य रुजवणूक करतेवेळी आधी ती स्वतःमध्ये असली पाहिजेत. म्हणून शिक्षकांनी स्वतःमध्ये बदल करून घेतला पाहिजे, कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात स्वतःपासून करणे गरजेचे असते. शिक्षकांनी स्वतः मूल्ये अंगिकारली पाहिजेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील कलागुण ओळखून त्यांचा विकास केला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविण्यासाठी विविध शालेय, सहशालेय अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रम घेणे अपेक्षित आहे. तसेच विशिष्ट उपक्रम घेतला म्हणजे विशिष्ट मूल्य रुजवणूक सहज होईल असे गृहीत धरणे पण चुकीचे आहे. मूल्य रुजविण्यासाठी उपक्रमांचे सुयोग्य नियोजन करून अंमलबजावणी करायला पाहिजे. वर्गात तर वेगवेगळ्या प्रकारचे विद्यार्थी असतात. ज्यामध्ये बौद्धिक, दिव्यांग, आर्थिक सामाजिक पार्श्वभूमी असणारे, अध्ययन क्षमता असणारे विविध विद्यार्थी असतात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविणे शिक्षकांसमोर आव्हान असते. म्हणूनच सदर संशोधन विषय हाती घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट :**

1. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविताना येणाऱ्या समस्यांच्या सद्यस्थितीचा शोध घेणे.
2. शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविताना येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गरज -**

1. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविताना येणाऱ्या समस्यांच्या सद्यस्थितीची माहिती मिळेल.

3. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविताना येणाऱ्या समस्यांच्या माहिती देता येईल.
4. पर्यावरण परिसंस्था टिकली तरच सजीवसृष्टी टिकू शकते याची जाणीव होण्यासाठी प्रस्तुत विषय अभ्यासणे गरजेचे आहे.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Volume 3, Issue 3, January 2023

IJARSCT
Impact Factor: 7.301

**संशोधनाचे महत्त्व -**

अ) प्रस्तुत संशोधनामुळे माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविण्याबाबतच्या महत्त्वपूर्ण घटकांचे ज्ञान मिळेल.

आ) शिक्षकांनी शालेय उपक्रमातून मूल्य रुजविण्यासाठी केलेल्या विशेष प्रयत्नांची माहिती समजेल.

**संशोधन व्याप्ती व मर्यादा:**

1.प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचाच विचार करण्यात आलेला आहे.

2.सदर संशोधन कार्यासाठी शिक्षकांच्या मूल्य रुजविण्यात येणाऱ्या समस्यांचाच विचारा केलेला आहे. आहे.

3.प्रस्तुत संशोधन कार्य केवळ शैक्षणिक वर्ष 2020-2022 मध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतीसादकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहेत.

परिमर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे पुढील घटकांसाठी परीमर्यादित आहे.

अ. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील लातूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांपुरतेच मर्यादित आहेत.

ब. प्रस्तुत संशोधनात मूल्य रुजविण्यासंदर्भातील समस्यांचा अभ्यास अपेक्षित आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना मूल्य रुजविण्यासंदर्भात विविध शालेय अभ्यासेत्तर व अभ्यासपुरक उपक्रम राबविले जातात. त्या उपक्रमामधून मूल्य रुजवणूक करता येते का हे जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

न्यादर्श: प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्श निवडताना संशोधकाने लातूर जिल्ह्यातील सहजप्राप्त 100 शिक्षकांची निवड

सहेतुक पद्धतीने न्यादर्शन केले आहे. ज्यात प्रामुख्याने सांस्कृतिक विभागप्रमुख शिक्षकाची किंव्हा सांस्कृतिक विभाग

नसेल तर त्या कार्याची जबाबदारी असलेल्या क्रीडा शिक्षकाची निवड करून माहिती संकलित केलेली आहे.

**माहिती संकलनाची साधने:** सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावलीची विश्वसनियता व सप्रमाणता तपासून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित केलेली आहे.

**संख्याकिय तंत्र:** संशोधकाने मूल्य रुजविण्याबाबतच्या प्रश्नावलीचा वापर करून माहिती संकलित केली केलेले आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

तक्ता क्रमांक 1

| प्रश्न क्र. | प्रश्न विवरण | शेकडा तिसाद प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| 2. | शाळेत अभ्यासेत्तर उपक्रम राबविले जातात प्रतिसाद | 60 | 40 |
| 12. | शाळेमध्ये खेळातील विद्यार्थी सहभाग प्रमाण किती | 35 | 65 |
| 17. | शाळेत विज्ञान प्रयोगशाळेत विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात का | 70 | 30 |

**निरीक्षण :**

1. विविध शालेय उपक्रमातून मुल्य रुजविण्यासंदर्भात माहिती संकलित करून विश्लेषण केले असता असता 60 % इतका प्रतिसाद मिळाला.
2. शालेय विविध खेळासंदर्भात प्राप्त विद्यार्थी सहभाग 35 % मिळाला.
3. शाळेत विज्ञान प्रयोगशाळेत विद्यार्थी स्वतः प्रयोग करण्याचे प्रमाण 30 % मिळाले.

**अर्थनिर्वचन :**

1. विविध शालेय उपक्रमातून मुल्य रुजविण्यासंदर्भात प्राप्त प्रतिसाद सामान्य मिळाला.
2. शाळेतील विज्ञान प्रयोगशाळेत विद्यार्थी स्वतः प्रयोग करण्याचे प्रमाण अल्प आढळून आले.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 3, January 2023

तक्ता क्रमांक 2

| प्रश्न क्र. | प्रश्न विवरण | शेकडा प्रतिसाद प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | पर्याय 1 | पर्याय 2 | पर्याय 3 |
| 11 | शाळेत सर्वाधिक घेतले जाणारे खेळ | 70 | 10 | 20 |
| 13 | खेळाच्या तासिकेत काय केले जाते | 40 | 25 | 35 |
| 16 | मुलांमध्ये गट पद्धतीने राहण्याविषयक प्रतिसाद | 40 | 50 | 10 |

**निरीक्षण :**

1. शाळेत केवळ मैदानी खेळासाठी 70 % इतका प्रतिसाद प्राप्त झाला.
2. शाळेत खेळाच्या तासिकेला मैदानावर रिकामे सोडले जाते असा 40 % प्रतिसाद मिळाला.
3. गटनिहाय कार्य 50 % इतका प्रतिसाद मिळाला.

**अर्थनिर्वचन :**

1. शाळेत मैदानी खेळातून मूल्य रुजविण्यासंदर्भात कमी प्रमाण दिसून आले.
2. मूल्य रुजविण्यासंदर्भात गटनिहाय कार्य प्रतिसाद सामान्य दिसून आले.

तक्ता क्रमांक 3

| प्रश्न क्र. | प्रश्न विवरण | शेकडा प्रतिसाद प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पर्याय 1 | पर्याय 2 | पर्याय 3 | पर्याय 4 |
| 3 | उपक्रम आयोजनाचा उद्देश | 40 | 40 | 10 | 10 |
| 4 | सांस्कृतिक उपक्रम | 30 | 30 | 20 | 20 |
| 6 | सामाजिक उपक्रम | 40 | 20 | 20 | 20 |
| 8 | वैज्ञानिक उपक्रम | 20 | 25 | 25 | 30 |
| 9 | मुल्य रुजविण्यातील अडथळा | 30 | 45 | 15 | 10 |
| 14 | प्रार्थनेनंतरची प्राथमिक तपासणी | 40 | 30 | 10 | 10 |
| 15 | शाळेतील व शाळेबाहेरील कामे | 50 | 20 | 10 | 20 |

**निरीक्षण :**

1. शालेय उपक्रमाचा उद्देश प्रतिसाद 40 % तर सामाजिक उपक्रमविषयक प्रतिसाद 20 % मिळाला.
2. सांस्कृतिक उपक्रमविषयक प्रतिसाद 40 % मिळाला.
3. वैज्ञानिक उपक्रमविषयक प्रतिसाद केवळ 10 % मिळाला.
4. प्रार्थनेनंतर गणवेष तपासण्याचे प्रमाण 40 % आढळले.

**अर्थनिर्वचन :**

1. वैज्ञानिक उपक्रम आयोजनाचे प्रमाण अत्यल्प आढळले.
2. सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजनाचे प्रमाण कमी आढळून आले.

**निष्कर्ष:**

1. विशिष्ठ दिन शाळेमध्ये साजरे केले जातात.
2. वाङ:मयीन उपक्रम, सामाजिक उपक्रम, ऐतिहासिक उपक्रम, विज्ञानविषयक उपक्रम,सत्कारविषयक उपक्रम क्वचितच शाळेमध्ये साजरे केले जातात.
3. शाळेमध्ये विविध सहशालेय उपक्रम घेतले जातात
4. शाळेमध्ये विशिष्ट उपक्रमातून विशिष्ट मूल्य रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात नाहीत.
5. उपक्रम राबविताना तो अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून राबविला जातो.
6. सामाजिक उपक्रम खूप कमी प्रमाणात राबविले जातात.
7. सामाजिक उपक्रमांसाठी बहुतांश विद्यार्थी सहभागी होतात.
8. सामाजिक उपक्रम राबविताना अभ्यासक्रमाशी संबंध नसणे दिसून आले.
9. वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठीचे उपक्रम राबविले जात नाहीत.
10. शाळेमध्ये मुला मुलांचे व मुली मुलींचे वेगवेगळे गट तयार केले जातात.
11. उपक्रम राबविताना शाळा, समाज, विद्यार्थी, पालक उदासीन असल्याचे दिसते.
12. अनेक शाळेत पुरेशी साधने उपलब्ध नाहीत.
13. शाळेच्या खेळाच्या तासिकेला अभ्यास दिला जातो किंवा विद्यार्थ्यांना बाहेर सोडून दिले

जाते.

14. विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा जास्त वापरता येत नाही.

15. मूल्य व उपक्रम यांची जोड घातली जात नाही.

**उपाययोजना :**

1. उपक्रमाचा आनंद घेण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे
2. मूल्य व उपक्रम यांची जोड घालावी.
3. उपक्रमासाठी उपक्रम न राबवता उद्देश डोळ्यासमोर ठेवून उपक्रम राबवावे.
4. शाळेमध्ये पालक विद्यार्थी शिक्षक यांचा सहभाग वाढवावा.
5. साधनांची उपलब्धता करून द्यावी.

**संदर्भग्रंथ**

[1].दांडेकर, वा. ना. (१९८५), शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
[2].भिंताडे, वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.
[3].मुळे, उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.
**[4].**Best, J.W. and Kahan J.V. (1998), Research in Education ( 7th edition)
**[5].**Corporate Social and
**[6].**Choudhary, C.M. (1991): “Research Methodology”, New Delhi, RBSA Publishers.
**[7].**Kothari, C.R. (2003): “Research Methodology”, New Delhi, WishwaPrakashan.
**[8].**Pandya, Shefali(2012), Research Methodology , New Delhi : APH Publishing Corporation.